# प्राथमिक /अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा

**डी.टी.एड./डी.एल.एड.**
**परीक्षा-जून-२०१७**
**अधिसूचना व ऑनलाईन आवेदनपत्रे**
**भरण्याचा कार्यक्रम**

अध्यापक विद्यालयाचे आणि जिल्हा शैक्षणिक
सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्थांचे प्राचार्य यांनी परीक्षेच्या
पूर्वतयारीसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत सूचना


**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद**
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे ४११ ००१
फोन:(०२०)२६१२३०६६, २६१२३०६७ फॅक्स:(२०)२६१२९९१९
website www.deledexam.in
Email - www.mscepune@gmail.com

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतील डी.टी.एड्. /डी.एल.एड्. परीक्षेशी संबंधित अधिकारी

| अ. क्र. | नाव | हुद्दा | दूरध्वनी | |
|---|---|---|---|---|
| | | | कार्यालय | मोबाईल |
| १. | श्री. डी. एम. पाटील | अध्यक्ष | २६१२३०६६/६७ | ९०४९९८६५६७ |
| २. | श्री. सुखदेव डेरे | आयुक्त | २६१२३०६६/६७ | ९८२२८५११७९ |
| ३. | श्रीम. एस.बी. गौड | उपायुक्त | २६१२३०६६/६७ | ८८०६४८६७२८ |
| ४. | श्री. उदयसिंह भोसले | सहा.आयुक्त | २६१२३०६६/६७ | ९८२२६२५४१२ |
| ५. | श्री. ए. एस. काथवटे | मूल्यमापन अधिकारी | २६१२३०६६/६७ | ९४२३२९६९२६ |
| ६. | श्रीम. व्हि.एस.भागवत | लेखाधिकारी | २६१२३०६६/६७ | ९७३०६४७१४४ |

* टीप * - सदरचे दूरध्वनी क्रमांक फक्त तातडीच्या कार्यालयीन संपर्कासाठी आहेत. ते विद्यार्थी / पालकांना देऊ नयेत. कारण विद्यार्थ्यांची कोणतीही वैयक्तिक माहिती परिषदस्तरावर उपलब्ध नसते. ती कॉलेज स्तरावर उपलब्ध असते.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १. | अध्यापक विद्यालयांनी Registration करणेबाबत सूचना | ४ |
| २. | परीक्षेसाठी संगणकीय आवेदनपत्रे भरून सादर करण्याबाबतची नियमावली | ५ |
| ३. | संगणकीय आवेदनपत्रे भरण्यापूर्वी प्राचार्यांनी घ्यावयाची दक्षता | ६ते ८ |
| ४. | परीक्षा शुल्क, संस्था नोंदणी शुल्क व विद्यार्थी नोंदणी शुल्क | ९ |
| ५. | प्रि-लिस्ट भरण्याबाबत घ्यावयाची दक्षता व डी.टी.एड्.५० अहवाल भरताना घ्यावयाची दक्षता | १० |
| ६. | वेळापत्रक | ११ |
| ७. | डी.टी.एड्. प्रथम वर्ष परीक्षा जून - २०१७ चे वेळापत्रक | १२ |
| ८. | डी.टी.एड्. द्वितीय वर्ष परीक्षा जून - २०१७ चे वेळापत्रक | १३ |
| ९. | डी.एल.एड्. प्रथम वर्ष परीक्षा जून-२०१७ चे वेळापत्रक | १४ |
| १०. | लेखनिक पुरविण्याबाबत शासन निर्णय दि.१८ मार्च २०१४ | १५ ते १८ |

# डी.टी.एड्./डी.एल.एड्. परीक्षा जून-२०१७

## अध्यापक विद्यालयांनी Registration करणेबाबत सूचना -

१) संगणकीय नोंदणी फॉर्म परिषदेच्या www.deledexam.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) www.deledexam.in ही वेबसाईट open केल्यानंतर Home page दिसेल. त्यामध्ये Institute Registration वर Click करावे. Institute registration फॉर्म दिसेल. तो फॉर्म प्रत्येक अध्यापक विद्यालयाने Online भरुन Submit बटनावर Click करावे.

३) Submit केल्यानंतर भरलेली माहिती दिसेल त्यामध्ये दुरुस्ती करावयाची असल्यास go back बटनावर Click करून माहितीमध्ये दुरुस्ती करावी. दुरुस्ती करावयाची नसल्यास Online बटनावर Click करावे.

४) Online बटनावर Click केल्यानंतर तुम्ही Registration fee भरण्यासाठी Payment get way या पेजवर जाल. Pay Now या बटनावर Click करुन Online फी भरावी.

५) Online फी भरल्यानंतर पैसे भरल्याची Receipt generate होईल.

६) प्राप्त Receipt वर Successful Payment असे लिहून आले तरच तुमचे Payment successful झाले असे ग्राहय धरावे. Receipt ची Print काढून आपल्या दप्तरी ठेवावी.

७) Payment Successful झाल्यानंतर जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायिक विकास संस्थेच्या login ला नोंदणी फॉर्म प्राप्त होतील. ते तपासून झाल्यानंतर जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायिक विकास संस्थांनी Online Aproval करावे.

८) त्यानंतर सर्व अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांच्या E-mail Id व Mobile नंबरवर User Id व Password येईल.

९) User Id व Password मिळाल्यानंतरच सर्व अध्यापक विद्यालयांनी विद्यार्थ्यांचे Online आवेदनपत्रे दिलेल्या वेळापत्रकानुसार भरावीत.

१०) १९९३ च्या अभ्यासक्रमाची आवेदनपत्रे पूर्वीप्रमाणेच ऑफलाईन भरुन त्यांचे परीक्षा शुल्क स्वतंत्र चलनाने बँकेत जमा करावे तसेच या आवेदनपत्रांची हार्ड कॉपी परीक्षा परिषदेकडे जमा करावीत.

# <u>परीक्षेसाठी संगणकीय आवेदनपत्रे भरून सादर करण्याबाबतची नियमावली</u>

**परीक्षा कालावधी - दि. ०१/०६/२०१७ ते १०/०६/२०१७**

**प्राथमिक शिक्षण पदविका (डी.एल.एड.) व अध्यापक शिक्षण पदविका (डी.टी.एड.) परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी परीक्षार्थी म्हणून पात्रतेचे निकष**

- परीक्षार्थीचा प्रवेश शासकीय कोट्यातील असल्यास राज्य शासनाने नियुक्त केलेल्या **"<u>राज्य डी.टी.एड्. व डी.एल.एड्. प्रवेश समितीने</u>"** मान्य केलेला असावा.

- प्रवेश स्पॉट/व्यवस्थापन कोट्यातील असल्यास, प्रवेशास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेतलेली असावी.

- प्रवेश पत्रद्वारा प्रशिक्षण योजनेतून असल्यास त्यास विद्या प्राधिकरण यांची मान्यता असणे आवश्यक आहे.

- परीक्षार्थीची ८०% उपस्थिती पूर्ण होणे आवश्यक आहे.

- ८०% पेक्षा कमी उपस्थिती असणाऱ्या परीक्षार्थींची अनुपस्थिती क्षमापित प्रकरणे दि. १५/०५/२०१७ पूर्वी प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायिक विकास संस्था यांनी निकाली काढावीत.

- D.T.Ed. परीक्षार्थीचे अंतर्गत गुण ५०% किंवा त्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

- अध्यापक विद्यालयाने वार्षिक पाठाचे नियोजन वेळेत करावे. त्याबाबत परीक्षा परिषदेने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. Online डी.टी.एड्.५० मध्ये वार्षिक पाठाचे गुण नोंदविणे आवश्यक आहे.

- डी.एल.एड. प्रथमवर्ष विद्यार्थ्यांचे आकारिक मूल्यमापन विद्या प्राधिकरणाने दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर गुणांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करणे आवश्यक आहे. एकदा गुण नोंदविल्यानंतर पुन:श्च गुणात बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

- प्राचार्य मान्यता नसल्याने किंवा प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायिक विकास संस्था यांची स्वाक्षरी नसल्याने किंवा इतर कोणत्याही कारणाने विहीत **कालमर्यादेनंतर डी.टी.एड्.५० सादर करणाऱ्या अध्यापक विद्यालयांना रू.१०००/- दंड शुल्कासह डी.टी.एड्.५० सादर करावे लागतील,** अन्यथा त्या अध्यापक विद्यालयाचा निकाल राखीव ठेवला जाईल व अध्यापक विद्यालयावर प्रशासकीय कारवाईची शिफारस करण्यात येईल.

- परीक्षा परिषद कार्यकारी समिती सभा क्र.४ दि.३०/१२/२०१४ मधील ठराव क्र.१०० अन्वये डी. टी. एड्. ५० मध्ये प्रात्यक्षिक गुणामध्ये तफावत असल्यास संबंधित अध्यापक विद्यालयास दंड आकारण्यात येईल. तसेच मा.संचालक विद्या प्राधिकरण, पुणेमार्फत संबंधित अध्यापक विद्यालयास याबाबत सक्त ताकीद देण्यात येईल.

# - ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यापूर्वी प्राचार्यांनी घ्यावयाची दक्षता -

**I)** परीक्षार्थीस लागू असणारा इयर कोड अचूकपणे निवडणे आवश्यक आहे कारण इयरकोडप्रमाणे परीक्षार्थ्याची सर्व माहिती संगणक पडद्यावर उपलब्ध होणार आहे. इयरकोडबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| तपशील | इयर कोड क्रमांक |
|---|---|
| **प्रथम वर्ष नियमित विद्यार्थी (First year fresh only)** | १ |
| **प्रथम वर्ष पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी(First year repeater only)** | २ |
| **द्वितीय वर्ष उत्तीर्ण असून फक्त प्रथम वर्षाच्या काही विषयास बसणारे विद्यार्थी (Second Year Pass & First year repeater only)** | ३ |
| **प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षेस एकाच वेळी बसणारा विद्यार्थी (Appearing for first & second year)** | ४ |
| **द्वितीय वर्ष नियमित विद्यार्थी (Second year fresh only)** | ५ |
| **द्वितीय वर्ष पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी (Second year repater only)** | ६ |

**II) सर्वसाधारण सूचना :-**

१) ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यापूर्वी माहिती पुस्तिका व सूचना वाचूनच माहिती भरावी.

२) द्वितीय वर्षाचे आवेदनपत्रे भरताना यापूर्वीचा नजिकच्या परीक्षेचा बैठक क्रमांक बिनचूक लिहावा. तो चुकीचा लिहील्यास अन्य विद्यार्थ्याची माहिती आवेदनपत्रावर येईल. त्याची जबाबादारी संबंधितांवर राहील. मागील गुणपत्रकावरुन प्राचार्यानी मागील बैठक क्रमांकाची पडताळणी करावी.

३) परीक्षा परिषदेने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावरच परीक्षार्थीस परीक्षा द्यावी लागेल. कोणत्याही परिस्थितीत केंद्र बदलता येणार नाही.

४) यापूर्वी डी.टी.एड्. परीक्षेस बसलेल्या आणि गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे त्यांची प्रतिबंधित मुदत संपली असल्याची खात्री केल्यानंतरच भरावीत. गैरमार्गाचा अवलंब केलेल्या उमेदवारावर लादलेल्या शास्तीची मुदत संपण्यापूर्वी त्यांचे आवेदनपत्र परीक्षा परिषदेकडे आपणाकडून सादर झाल्यास **त्यास संबंधित प्राचार्य हे व्यक्तीशः जबाबदार राहतील व त्यामुळे उद्‌भवणा-या न्यायालयीन प्रकरणाचा खर्च त्यांना भरावा लागेल.**

५) प्रपत्र A मध्ये दिलेल्या तक्त्यातील मुद्दा क्र. ४ व ५ मधील माहिती ऑनलाईन भरावी व Submit बटनावर क्लिक करावे.

६) प्राचार्य, DIECPD यांनी जिल्ह्यातील प्रत्येक अध्यापक विद्यालयाची मंजूर क्षमतेची पडताळणी करुनच प्रपत्र 'A', 'B', 'C', 'D', 'E' Confirm करावीत.

७) अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांनी सोबत दिलेल्या संभाव्य वेळापत्रकानुसार कार्यवाही होईल, याची दक्षता घ्यावी.

**III) पत्रद्वारा प्रशिक्षण योजना -** पत्रद्वारा प्रशिक्षण योजनेच्या १९९३ च्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रावर 'उपसंचालक पत्रद्वारा प्रशिक्षण योजना विद्या प्राधिकरण, पुणे यांची प्रतिस्वाक्षरी घेऊन संबंधित अध्यापक विद्यालयांनी विहीत मुदतीत आवेदनपत्रे सादर करावीत. विहीत मुदतीत आवेदनपत्रे सादर न करणाऱ्या अध्यापक विद्यालयाच्या प्राचार्यांना शासन निर्णयानुसार विलंब शुल्क भरावे लागेल. याची कृपया नोंद घ्यावी.

(शासन निर्णय क्र.एस.सी.एच.२००५/(२३६/०५)साशि-१, दि.०३ एप्रिल २००६)

उपसंचालक पत्रद्वारा प्रशिक्षण योजना पुणे यांनी आवेदनपत्रावर प्रतिस्वाक्षरी करण्यापूर्वी खालील बाबींची गांभीर्यपूर्वक खात्री करावी.

**अ) पत्रद्वारा प्रवेश** : उमेदवाराचा प्रवेश नियमानुसार असून पत्रद्वारा प्रशिक्षण योजनेच्या मान्य यादीतील आहे व त्याचे प्रवेशाचे माध्यम बरोबर आहे.

**ब) परीक्षा पूर्व अटीची पूर्तता** : उमेदवाराने परीक्षेसाठी आवश्यक उपस्थिती व अंतर्गत काम पूर्ण केल्याची खात्री केली आहे. (नियमानुसार संपर्क सत्रे पूर्ण झाली आहेत.)

**क) प्रतिबंधित कालावधी** : गैरमार्ग प्रकरणी शिक्षा दिलेल्या उमेदवाराचा प्रतिबंधीत कालावधी पूर्ण झाल्याची खात्री केली आहे.

उपरोक्त अ,ब,क बाबीची खात्री केल्याशिवाय पत्रद्वारा उमेदवाराच्या आवेदनपत्रावर उपसंचालक पत्रद्वारा यांनी प्रतिस्वाक्षरी करु नये.

**IV) अंतर्गत मूल्यमापनाचे गुणाबाबत (डी.टी.एड्.) - अभ्यासक्रम १९९३**

१) सर्व नियमित उमेदवारांचे तसेच पत्रद्वारा प्रशिक्षण योजनेअंतर्गत नियमित परीक्षार्थ्यांचे अंतर्गत मूल्यमापनांचे गुण व वार्षिक पाठाचे गुण विहीत नमुन्यात (डी.टी.एड्.५०) न चुकता परिषदेने निर्धारित केलेल्या कालावधीत परीक्षा परिषदेकडे Online सादर करावेत. विहीत कालावधीत याप्रमाणे कार्यवाही न झाल्यास व संबंधित उमेदवार प्रात्यक्षिक गुणाअभावी अनुत्तीर्ण घोषीत झ्‍ााल्यास त्याची जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील.

**अंतर्गत गुण नोंदविताना प्राचार्यांनी स्वत: खात्री करून घ्यावी. अंतर्गत मूल्यमापनाच्या गुणाबाबतच्या नोंदीमधील चुका दंडात्मक कारवाईस पात्र राहतील, याची प्राचार्यांनी नोंद घ्यावी.**

२) डी.टी.एड्. ५० मध्ये अंतर्गत गुण देताना कमाल मर्यादेपेक्षा जास्त गुण दिलेले नाहीत, याची पूर्णपणे खात्री करावी. अन्यथा या चुका करणा-या शिक्षक व प्राचार्य या दोघांनाही जबाबदार धरण्यात येईल व दंडात्मक/प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. किमान गुणांपेक्षा कमी गुण नोंदविलेले असल्यास अशा गुणांमधे दुरुस्ती करण्यात येणार नाही.

V) ऑनलाईन आवदेनपत्रांची संपूर्ण छाननी झाल्यानंतरच विद्यार्थी सर्व नियम व अटीच्या संदर्भात पात्र आहे की अपात्र हे ठरविण्याचा अधिकार परीक्षा परिषदेस आहे. तसेच **'परीक्षा दिल्यानंतरही संबंधितांच्या पात्रतेबाबत त्रुटी आढळल्यास संबंधितांची संपादणूक रद्द करण्याचा अधिकार परीक्षा परिषदेस राहील'** याची संबंधितांनी नोंद घ्यावी. ही बाब सर्व परीक्षार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

VI) **परीक्षेचे वेळापत्रक उमेदवारांच्या निदर्शनास आणण्याबाबत -** प्राथमिक/अध्यापक शिक्षण पदविका जून-२०१७ च्या परीक्षेसाठी निश्चित केलेले परीक्षांचे वेळापत्रक सोबत जोडलेले आहे. सदर परीक्षांचे वेळापत्रक उमेदवारांच्या निदर्शनास आणावे.

VII) **अपंगत्वाच्या सवलतीबाबत -** जे परीक्षार्थी ४०% किंवा त्याहून अधिक अपंगत्व असलेले आहेत त्यांनी ऑनलाईन आवेदनपत्र भरतेवेळी तसा पर्याय निवडावा. तसेच आवेदनपत्रासोबत उमेदवाराचा फोटो असलेले जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अपंगत्व प्रमाणपत्राची छायांकित प्रत Scan करून Uplod करावी. १९९३ च्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी आवेदनपत्र परिषदेत जमा करतेवेळी अपंगत्वाच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करुन परिषदेकडे जमा करावी.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क.२, दि.१८ मार्च २०१४ नुसार -

१. अपंग उमेदवाराला परीक्षेसाठी लेखनिक हा परीक्षा घेणाऱ्या अधिकाऱ्याने पुरवावा अथवा उमेदवाराने त्याची इच्छा असल्यास स्वत: लेखनिकाची व्यवस्था करावी.

२. परीक्षेचा कालावधी एक तासापेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त वेळ देताना प्रत्येक तासाला २० मिनीटे अतिरिक्त वेळ याप्रमाणे गणना करावी.

३. अल्पदृष्टी उमेदवार लेखनिक वापरत नसला तरी त्यास प्रत्येक तासाला अतिरिक्त २० मिनीटे वेळ देण्यात यावा.

४. उमेदवारास प्रश्नपत्रिका देताना व उत्तरपत्रिका परत घेताना त्यावर त्या त्या वेळेची नोंद घेण्यात यावी. तसेच पुरवणीपत्रिका वेळेत पुरविण्यात याव्यात.

**VIII) परीक्षा शुल्क :** जून - २०१७ साठी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क राहील.

**१) संस्था नोंदणी शुल्क :**

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून संस्था नोंदणी शुल्क रु. २०००/- इतके करण्यात आलेले आहे. सदर शुल्क ऑनलाईन भरावयाचे आहे. शुल्क भरल्याशिवाय कॉलेज रजिस्ट्रेशन करता येणार नाही.

**२) विद्यार्थी नोंदणी शुल्क :**

सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षापासून प्रथम वर्ष (डी.एल.एड.) विद्यार्थी नोंदणी शुल्क रु. २००/- इतके करण्यात आलेले आहे. परीक्षेचे आवेदनपत्र भरताना परीक्षा शुल्क, विद्यार्थी नोंदणी शुल्क एकत्रित ऑनलाईन भरावयाचे आहे.

**३) परीक्षा शुल्क**

**डी.टी.एड. परीक्षेसाठी**

| तपशील | शुल्क दर रुपये | परीक्षा शुल्क ऑनलाईन भरण्यात यावे. |
|---|---|---|
| १) लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा<br>२) वार्षिक पाठ | प्रति विषय रू.७५/- प्रमाणे<br>प्रति पाठ रू. ७५/- प्रमाणे | |

**डी.एल.एड. परीक्षेसाठी**

| तपशील | शुल्क दर रुपये | परीक्षा शुल्क ऑनलाईन भरण्यात यावे. |
|---|---|---|
| लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा | प्रति विषय रू. ७५/- प्रमाणे | |

**सदर शुल्काचा तपशील विद्यार्थी व पालकांच्या माहितीसाठी सूचना फलकावर लावावा.**

परीक्षा शुल्क हे Screen वर दिसणाऱ्या ऑप्शनप्रमाणे ऑनलाईन भरावयाचे आहे. त्याची पावती आपल्याकडे जपून ठेवायची आहे.

## प्रि-लिस्ट भरताना घ्यावयाची दक्षता-

www.deledexam.in या परिषदेच्या संकेतस्थळावर दि. २५/०४/२०१७ ते दि. ३०/०४/२०१७ या कालावधीत प्रि-लिस्ट प्रसिध्द केली जाईल. त्यानुसार आवश्यकता असल्यास विद्यार्थ्यांच्या आवेदनपत्रातील काही बाबींमध्ये दुरूस्ती करता येईल. दि. ३०/०४/२०१७ नंतर कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही.

## अध्यापक विद्यालयांनी डी.टी.एड. ५० भरण्याबाबत सूचना-

परिषदेच्या संकेतस्थळावर दि. २०/०५/२०१७ ते २५/०५/२०१७ या कालावधीत डी.टी.एड.५० परीक्षार्थींचे अंतर्गत व प्रात्यक्षिक गुण भरण्यासाठी प्रसिध्द केली जाईल.

प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व व्यावसायिक विकास संस्था यांनी आपल्या अधिनस्त सर्व अध्यापक विद्यलयांचे डी.टी.एड.५० दि.२०/०५/२०१७ ते २५/०५/२०१७ या कालावधीत तपासून Aproval करणे आवश्यक आहे.

दिलेल्या कालावधीमध्ये अचूक माहिती ऑनलाईन भरावयाची आहे. सदर माहिती चुकीची भरल्यास त्याची जबाबदारी संबंधित अध्यापक विद्यालयावर राहिल.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

प्राथमिक शिक्षण पदविका अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा **: जून-२०१७**

(D.T.Ed./D.El.Ed.)

सर्व अध्यापक विद्यालयांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे ते

विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रे वाटप करणेबाबत कामाचे

# वेळापत्रक

| अ.क्र. | कामाचा तपशील | दिनांक/कालावधी |
|---|---|---|
| १. | सर्व DIECPD यांना Login ID आणि Password देणे. | १६/०३/२०१७ ते २०/०३/२०१७ |
| २. | DIECPD अधिनस्त अध्यापक विद्यालयांना Login ID आणि Password देणे व तपासून approve करणे. | २३/०३/२०१७ ते ३१/०३/२०१७ |
| ३. | अध्यापक विद्यालयांनी २००४ व २०१६ या अभ्यासक्रमाच्या परीक्षार्थींचे ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे. व १९९३ च्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे ऑफलाईन आवेदनपत्र भरणे. | ०१/०४/२०१७ ते १६/०४/२०१७ |
| ४. | १९९३ च्या अभ्यासक्रमाची परिपूर्ण आवेदनपत्रे परीक्षा परिषदेकडे जमा करणे. | १६/०४/२०१७ ते २०/०४/२०१७ |
| ४. | विलंब शुल्क भरुन ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे. | १६/०४/२०१७ ते २३/०४/२०१७ |
| ५. | अतिविलंब शुल्क भरुन ऑनलाईन आवेदनपत्रे भरणे. | २४/०४/२०१७ ते १६/०५/२०१७ |
| ६. | प्राचार्य DIECPD यांनी परिषदेच्या संकेत स्थळावर केंद्र निश्चित करुन देणे. | ०२/०५/२०१७ ते ०५/०५/२०१७ |
| ७. | कोऱ्या उत्तरपत्रिका जिल्हा स्टेशनरी परिरक्षकाकडे पोहोच करणे. | ०६/०५/२०१७ते १०/०५/२०१७ |
| ८. | प्राचार्य DIECPD यांनी केंद्रसंचालकाची यादी निश्चित करुन देणे. | ०६/०५/२०१७ ते ०८/०५/२०१७ |
| ९. | सर्व अध्या.विद्या. यांनी प्रिलिस्ट दुरुस्ती Online करणे. | २५/०४/२०१७ ते ३०/०४/२०१७ |
| १०. | सर्व अध्या. विद्या. अंतर्गत व प्रात्यक्षिक गुण डी.टी.एड्.५० मध्ये Online भरणे. | २०/०५/२०१७ ते २५/०५/२०१७ |
| ११. | प्राचार्य DIECPD यांनी अधिनस्त अध्यापक विद्यालयांची डी.टी.एड्.५० तपासून Online approve करणे. | २५/०५/२०१७ ते ३०/०५/२०१७ |
| १२. | सर्व अध्यापक विद्यालयांना संकेतस्थळावर Online प्रवेशपत्रे उपलब्ध करून देणे व त्यांनी विद्यार्थ्यांना वितरीत करणे. | २०/०५/२०१७ ते ३१/०५/२०१७ |
| १३. | प्रत्यक्ष डी.टी.एड्./ डी.एल्.एड्. परीक्षा जून-२०१७ कालावधी | ०१/०६/२०१७ ते १०/०६/२०१७ |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा : **जून - २०१७**

## प्रथम वर्ष

# वेळापत्रक डी.टी.एड्.

| दिनांक | वार | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| 01/06/2017 | गुरुवार | 11.00 ते 01.00 | शैक्षणिक मूल्यमापन (83)<br>Educational Evaluation (83) | 40 |
| 02/06/2017 | शुक्रवार | 11.00 ते 02.00 | भारतीय समाज आणि प्राथमिक शिक्षण (81)<br>Indian Society and Primary Education (81) | 80 |
| 03/06/2017 | शनिवार | 11.00 ते 01.00 | शैक्षणिक व्यवस्थापन (84)<br>Educational Management (84) | 40 |
| 04/06/2017 | रविवार | सुट्टी | | |
| 05/06/2017 | सोमवार | 11.00 ते 02.00 | अध्ययन - अध्यापनाचे मानसशास्त्र (82)<br>Psychology of Teaching & Learning (82) | 80 |
| 06/06/2017 | मंगळवार | 11.00 ते 01.00 | कार्यशिक्षण (86)<br>Work Education (86) | 40 |
| 07/06/2017 | बुधवार | 11.00 ते 02.00 | गणित (85)<br>Mathematics (85) | 80 |
| 08/06/2017 | गुरुवार | 11.00 ते 02.00 | प्रथम भाषा (विषयज्ञान व अध्यापन पध्दती)<br>First Language (Content & Method)<br>(001,002,003,004,005,008) | 80 |
| 09/06/2017 | शुक्रवार | 11.00 ते 01.00 | शारीरिक शिक्षण (87)<br>Physical Education (87) | 40 |
| 10/06/2017 | शनिवार | 11.00 ते 02.00 | द्वितीय भाषा (विषयज्ञान व अध्यापन पध्दती)<br>हिंदी (117/517)<br>हिंदी मराठी संयुक्त (217/417/817)<br>Second Language (Content & Method)<br>Hindi & Hindi Marathi Composite | 80 |
| 10/06/2017 | शनिवार | 03.00 ते 06.00 | द्वितीय भाषा - मराठी (हिंदी माध्यमाच्या विद्यार्थ्यांसाठी)<br>विषयज्ञान व अध्यापन पध्दती (317)<br>Second Language – Marathi (Content & Method)<br>For Hindi medium Candidates | 80 |

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## अध्यापक शिक्षण पदविका परीक्षा : **जून-२०१७**

## द्वितीय वर्ष

# वेळापत्रक डी.टी.एड्.

| **दिनांक** | **वार** | **वेळ** | **विषय** | **गुण** |
|---|---|---|---|---|
| 01/06/2017 | गुरुवार | 3.00 ते 6.00 | प्राथमिक शिक्षण सद्य:स्थिती समस्या व उपाय (९१)<br>Present status of Primary Educatio Difficulties & Remeidies (91) | 80 |
| 02/06/2017 | शुक्रवार | 3.00 ते 5.00 | आरोग्य - शिक्षण (वैयक्तिक, शालेय) (९६)<br>Health Education (Individual & School ) (96) | 40 |
| 03/06/2017 | शनिवार | 3.00 ते 6.00 | तृतीय भाषा इंग्रजी (११८/२१८/३१८/४१८/८१८)<br>Third Language English (118/218/318/418/818) | 80 |
| 04/06/2017 | रविवार | **सुट्टी** | | |
| 05/06/2017 | सोमवार | 3.00 ते 5.00 | कृति संशोधन व नवोपक्रम (९३)<br>Action Research & Innovations (93) | 40 |
| 06/06/2017 | मंगळवार | 3.00 ते 5.00 | माहिती संप्रेषण व तंत्रज्ञान (९२)<br>Information, communication & Technology (92) | 40 |
| 07/06/2017 | बुधवार | 3.00 ते 6.00 | विज्ञान व तंत्रज्ञान (९४)<br>Science & Technology | 80 |
| 08/06/2017 | गुरुवार | 3.00 ते 5.30 | इतिहास, नागरिकशास्त्र प्रशासन (९५-अे)<br>History, Civics and Administration (95-A) | 60 |
| 09/06/2017 | शुक्रवार | 3.00 ते 5.30 | परिसर अभ्यास, भूगोल (९५-बी )<br>Envionmental Study & Geography (95-B) | 60 |
| 10/06/2017 | शनिवार | 3.00 ते 6.00 | तृतीय भाषा मराठी (५१८) (इंग्रजी माध्यमासाठी)<br>Third Language Marathi (518) (For English Medium) | 80 |

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

प्राथमिक शिक्षण पदविका परीक्षा : **जून-२०१७**

## प्रथम वर्ष

# वेळापत्रक (डी.एल.एड्.)

| दिनांक | वार | वेळ | विषय | गुण |
|---|---|---|---|---|
| 01/06/2017 | गुरुवार | 11.00 ते 01.00 | बालकाचा विकास व स्व ची जाणीव (एफ-१)<br>Child Development and Self Awareness | 40 |
| 02/06/2017 | शुक्रवार | 11.00 ते 01.00 | शिक्षण प्रक्रिया व समाज (एफ-२)<br>Educational Process and Society | 40 |
| 03/06/2017 | शनिवार | 11.00 ते 01.00 | अभ्यासक्रम, अध्ययन- अध्यापनशास्त्र आणि मूल्यमापन (एफ-३)<br>Curriculum, Pedagogy and Evalulation | 40 |
| 04/06/2017 | रविवार | सुट्टी | | |
| 05/06/2017 | सोमवार | 11.00 ते 01.00 | इंग्रजी भाषा संप्रेषण व प्रभुत्व भाग-१ (एफ-४)/<br>Proficiency in English (Part-I)<br>मराठी भाषा संप्रेषण व प्रभुत्व भाग-१ (एफ-४)<br>Proficiency in Marathi (Part-I) | 40 |
| 06/06/2017 | मंगळवार | 11.00 ते 01.00 | भाषा विषयाचे अध्ययन-अध्यापनशास्त्र (प्रथम/तृतीय भाषा) (एफ-५)<br>Pedagogy of Language (I & III Language) | 40 |
| 07/06/2017 | बुधवार | 11.00 ते 12.00 | इंग्रजी अध्ययन - अध्यापन शास्त्र भाग-१ (एफ-६)<br>Pedagogy of English (Part-I) | 20 |
| 08/06/2017 | गुरुवार | 11.00 ते 01.00 | गणित अध्ययन - अध्यापनशास्त्र (एफ-७)<br>Mathematics Pedagogy | 40 |
| 09/06/2017 | शुक्रवार | 11.00 ते 01.00 | परिसर अभ्यास अध्ययन- अध्यापनशास्त्र (एफ-८)<br>Environmental Science Pedagogy | 40 |

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: न्यायाप्र-२०१४/प्र.क्र.१/अ.क.२**
मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख : १८ मार्च, २०१४

**वाचा:-**

१) अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५
२) अपंग कल्याण आयुक्तालय यांचे अकआ/प-७/लेखनिक/सुविधा/२००६-०७/२९५१, दि.२० डिसेंबर, २००६ परिपत्रक
३) अपंग कल्याण आयुक्तालय यांचे अकआ/प्र-७/लेखनिक/सुविधा/डिस्लेक्सिया/२०११-१२/२३६६, दि.२२ जून, २०११ चे शुध्दिपत्रक
४) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र.अपंग-२०११/प्र.क्र.१/२०११/आस्था-२, दि.२३मे,२०११ चे पत्र
५) रिट याचिका क्र.३२९४/२०१० व इतर जनहित याचिका बाबत मा.उच्च न्यायालयाचे दि.२९ एप्रिल, २०११ चे आदेश
६) रिट याचिका क्र.३२९४/२०१० व इतर जनहित याचिका बाबत मा.उच्च न्यायालयाचे दि.५ ऑगस्ट, २०११ चे आदेश
७) शासन परिपत्रक क्रमांक:- न्यायाप्र-२०११/प्र.क्र.९१/सुधार-३, १७ ऑगस्ट, २०११
८) केंद्रिय सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार यांचे कार्यालयीन आदेश दि.२६ फेब्रुवारी, २०१३

**प्रस्तावना:-** अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ मधील कलम क्र.५ व ६ नुसार अपंग व्यक्तींना शालेय, महाविद्यालयीन, पूर्व प्रवेश परिक्षा तसेच स्पर्धा परीक्षेसाठी लेखनिक उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तथापि अशा सूचना संबंधित प्राधिकाऱ्यांना वेळोवेळी देऊनही अपंग व्यक्तींना लेखनिक उपलब्ध करून देताना समस्या निर्माण होत असल्याचे तसेच काही स्पर्धा परीक्षांमध्ये लेखनिक उपलब्ध करून दिला नसल्याचे निदर्शनास आले. मा.उच्च न्यायालयानेही वरील अनु.क्र.६ येथे नमूद केलेल्या याचिका प्रकरणी दि.५ ऑगस्ट, २०११ रोजी अपंग व्यक्तींना सर्व परीक्षांमध्ये लेखनिक उपलब्ध करुन देण्याबाबत शासन स्तरावरुन सूचना देण्याचे निदेश दिले. त्यास अनुसरुन या विभागाच्या दि. १७ ऑगस्ट, २०११ च्या परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या.

तथापि, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील सुमोटो याचिका क्र.२०१३/७९३८ यामध्ये दिलेल्या अंतरिम निर्णयात लेखनिक उपलब्ध करून देण्याबाबत सुधारित सूचना निर्गमित करण्याबाबत आदेशित केले आहे. तसेच केंद्र शासनानेही दि.२६.०२.२०१३ च्या कार्यालयीन आदेशान्वये लेखनिक उपलब्ध करून देण्याबाबत विविध सूचना केलेल्या आहे. या सर्व बाबींचा एकत्रित विचार करून उपरोक्त दि. १७ ऑगस्ट, २०११ चे परिपत्रक अधिक्रमीत करून नव्याने सुधारित परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :-** दृष्टीहीन, अल्पदृष्टी, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी आणि डिस्लेक्सियाने बाधित झालेले विद्यार्थी / उमेदवार लिहीण्यासाठी सक्षम नसल्यास परीक्षा प्रयोजनार्थ त्यांच्या मागणीप्रमाणे लेखनिक व अन्य बाबीसंदर्भात दिनांक १७ ऑगस्ट, २०११ चे परिपत्रक अधिक्रमिक करून खालीलप्रमाणे नव्याने सूचना देण्यात येत आहेत. या सूचना स्पर्धात्मक परीक्षा व नियमित स्वरूपाच्या परीक्षा याकरीता समान असतील :-

१) अपंग उमेदवाराला परीक्षेसाठी लेखनिक हा परीक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने पुरवावा अथवा उमेदवाराने त्यांची इच्छा असल्यास स्वत: लेखनिकाची व्यवस्था करावी.

२) परीक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्याने नेमणूकीच्या जाहिरातीमध्ये लेखनिक उपलब्ध करून देण्याबाबत सुस्पष्ट उल्लेख करावा.

३) उमेदवारांने परीक्षा आयोजित करणाऱ्या संबंधित यंत्रणेकडून लेखनिक घेणार आहे किंवा उमेदवार स्वत: लेखनिकाची व्यवस्था करणार आहे याचा अर्जात स्पष्ट उल्लेख करावा.

४) परीक्षा घेणाऱ्या यंत्रणेने परीक्षेच्या आवश्यकतेप्रमाणे लेखनिकाची सक्षमता तपासून निवड करावी व त्याप्रमाणे जिल्हा / विभागीय किंवा राज्य पातळीवर त्यांचे पॅनेल तयार करावा.

५) लेखनिकाचे पॅनेल हे आवश्यकतेप्रमाणे त्या-त्या शाखेनुसार उदा. कला, वाणिज्य, विज्ञान, गणित, अभियांत्रिकी, वैद्यकीय इत्यादी विषयाप्रमाणे करावे व फक्त पात्र आणि सक्षम लेखनिकाचा त्या पॅनेलमध्ये समावेश करावा. शक्यतो परीक्षार्थी व लेखनिक हे एकाच शाखेचे असावेत. मात्र उमेदवार स्वत: लेखनिक उपलब्ध करून घेणार असल्यास त्याचे वय, शैक्षणिक अर्हता, परीक्षेतील गुण व अन्य बाबींबाबत कोणतेही निर्बंध असणार नाहीत. काही अपवादात्मक परिस्थितीत परीक्षा सुरु होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार मुख्य समवेक्षक यांना राहतील.

६) परीक्षेच्या वेळी पर्यवेक्षक आणि समवेक्षक यांनी योग्य ते पर्यवेक्षण करून फसवणूकीचे किंवा तत्सम गैरप्रकार होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

७) परीक्षा मंडळाकडून उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या लेखनिकाची एक दिवस अगोदर भेट घेण्याची परवानगी संबंधित उमेदवारास देण्यात यावी. तसेच संगणकाद्धारे द्यावयाच्या परीक्षेसाठी सदर संगणक व त्याची आज्ञाप्रणाली परीक्षेच्या एक दिवस अगोदर तपासण्याची मुभा उमेदवारास असेल.

८) वेगवेगळ्या विषयाच्या पेपरसाठी मुख्यत्वेकरून भाषाविषयक परीक्षेसाठी वेगवेगळे लेखनिक उमेदवारास वापरता येतील.

९) परीक्षेचे माध्यम (उदा.सर्वसाधारण / ब्रेल लिपी / संगणकाद्धारे / ध्वनीमुद्रण) स्विकारण्याचा पर्याय उमेदवारास उपलब्ध असावा. ब्रेल लिपीचा वापर करण्यात आल्यास त्याचा अनुवाद इंग्रजी अथवा स्थानिक भाषेत करण्याची यंत्रणा उपलब्ध करून देण्यात यावी. उमेदवाराने अर्जाद्धारे दिलेली माहिती विचारात घेऊन परीक्षा मंडळाने प्रश्नावली व अन्य बाबीं संदर्भात कार्यपध्दती निश्चित करावी. तसेच उमेदवारास संवाद साधणारे कॅल्क्युलेटर (Talking Calculator) (ज्या परीक्षा पद्धतीत कॅल्क्युलेटर वापरण्याची परवानगी देण्यात आलेली आहे अशा बाबतीत) ॲबॅकस, सुसंवाद साधणारी उपकरणे जसे इलेक्ट्रॉनिक उपकरणे, कम्युनिकेशन चार्ट या बाबी उमेदवारास आवश्यकतेनुसार पुरविण्यात याव्यात.

१०) अ) परीक्षेची बैठक व्यवस्था करताना दोन दृष्टीहीन उमेदवारांमध्ये किमान पुरेसे अंतर राहील याची दक्षता पर्यवेक्षकांनी घ्यावी, जेणेकरुन एक दृष्टीहीन उमेदवार त्याच्या लेखनिकाशी संभाषण करताना दुसऱ्या दृष्टीहीन उमेदवारास वा अन्य लेखनिकास ऐकू जाणार नाही.

ब) परीक्षेच्या वेळी उमेदवारांचा गोंधळ व संभ्रम टाळण्यासाठी परिक्षा सुरु होण्यापूर्वी योग्य अशी स्वतंत्र बैठक व्यवस्था अपंग उमेदवारांसाठी करण्यात यावी. अपंग उमेदवार व लेखनिक (आवश्यकतेनुसार) यांच्या बसण्याची व्यवस्था शक्यतो तळमजल्यावर करण्यात यावी व त्याबाबतची माहिती अपंग उमेदवारास आगाऊ देण्यात यावी.

११) लेखनिकाच्या मान्यता पत्रात खालील माहिती / तपशील नमूद करण्यात यावी.

१. परिक्षेसाठी उमेदवारास द्यावयाचा जादा वेळ
२. लेखनिकाच्या वेगळे / स्वतंत्र बसण्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था
३. अपवादात्मक परिस्थितीत लेखनिक बदलणे आवश्यक असल्यास, त्यासाठी सक्षम प्राधिकारी यांचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक

१२) लेखनिकाय अल्पोपहार घ्यावयाचा असल्यास त्याने तो परिक्षेच्या अगोदर किंवा नंतर घ्यावा.

१३) उमेदवार व लेखनिक यांना परिक्षेच्या वेळेबद्यल संपूर्ण माहिती देण्यात यावी.

१४) अतिरिक्त वेळ :-

१. लेखी परिक्षा एक तासाची असल्यास त्यासाठी किमान २० मिनीटे अतिरिक्त वेळ देण्यात यावा.
२. त्याचप्रमाणे परिक्षेचा कालावधी एक तासापेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त वेळ देताना प्रत्येक तासाला २० मिनीटे अतिरिक्त वेळ याप्रमाणे गणना करावी.
३. अल्पदृष्टी उमेदवार लेखनिक वापरत नसला तरी त्यास प्रत्येक तासाला अतिरिक्त २० मिनीटे वेळ देण्यात यावा.
४. उमेदवारास प्रश्नपत्रिका देताना व उत्तरपत्रिका परत घेताना त्यावर त्या त्या वेळेची नोंद घेण्यात यावी. तसेच पुरवणी पत्रिका वेळेत पुरविण्यात याव्यात.

१५) प्रश्न पत्रिकेमधील मूळ प्रश्नात दृष्य बाबी समाविष्ट असल्यास अथवा उमेदवाराकडून अशा दृष्य बाबींचा अर्थ लावणे किंवा दृष्य बाबींचे सादरीकरण करणे अपेक्षित असल्यास अशा प्रश्नांचे ऐवजी पर्यायी प्रश्न पुरविण्यात यावेत. मात्र उमेदवारास उत्तर देण्यासाठी पर्यायी प्रश्नांचे ऐवजी मूळ प्रश्न निवडण्याची मुभा राहील.

१६) परिक्षेकरीता प्रश्नावली निश्चित करताना आकृती व आलेख यावर आधारित असलेल्या प्रश्नाऐवजी पर्यायी प्रश्न अंध व क्षीणदृष्टी उमेदवारांसाठी प्रश्नपत्रिकेत उपलब्ध करुन देण्यात यावेत.

१७) दृष्टीहीन उमेदवारांना उत्तरपत्रिका लिहीताना ब्रेलचा वापर करण्याची किंवा संगणक अथवा टंकलेखन यंत्र वापरण्याची मुभा राहील. ब्रेल लिपीमधील उत्तरपत्रिकेचे मुल्यांकन हे ब्रेल लिपी डिजिटल टेक्स्ट (Digital text) मध्ये पुरविण्यात यावी. ज्या परिक्षा प्रक्रियेत सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे वापरण्याची सवलत देण्यात आलेली असेल तेथे उमेदवारास टेलर फ्रेम, ब्रेल स्लेट, जॉमेट्री किट, मेजरिंग टेप इत्यादी सहाय्यक तंत्रज्ञान व उपकरणे वापरण्याची मुभा राहील.

१८) परीक्षा पद्धतीमध्ये पुस्तकांचा वापर करणे आवश्यक असेल तेथे ब्रेल लिपिमध्ये संबंधित पुस्तके वापरण्याची मुभा अंध उमेदवारास असेल. तसेच संगणकाचा वापर असल्यास त्या आज्ञा प्रणालीवरील माहिती वाचता येऊ शकणाऱ्या उपकरणाची सोय उमेदवारास उपलब्ध करुन देण्यात यावी.

१९) अल्पदृष्टी उमेदवारास परिक्षेसाठी आवश्यक असणारी उपकरणे पुरविण्याची तजविज पर्यवेक्षकांनी करावी. मात्र त्यासंदर्भात उमेदवाराने संबंधित परिक्षा मंडळाकडे लेखी विनंती करणे आवश्यक राहील. अथवा उमेदवाराने अशी उपकरणे परीक्षेकरिता वापरण्यासाठी स्वतंत्र उपलब्ध केल्यास ती वापरण्याची त्यास मुभा राहील. तथापि, सदर उपकरणे वापरण्यास मुभा देण्यापूर्वी परीक्षा मंडळाकडून पुरविण्यात येणाऱ्या उपकरणासारखेच असल्याची खात्री संबंधित पर्यवेक्षक करील.

२. ऑनलाईन (online) परीक्षा पध्दती संदर्भात स्वतंत्ररित्या कार्यवाही करण्यात येऊन आवश्यक त्या सूचना देण्यात येतील.

३. अपंग विद्यार्थ्यास संबंधित वैद्यकिय प्राधिकारी यांनी दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र राज्यातील संबंधित परीक्षा मंडळ, परीक्षा केंद्र व शिक्षणसंस्था यांनी ग्राह्य धरावे.

४. उपरोक्त सूचना ह्या लेखनिकासाठीच मर्यादित नसून आवश्यकतेनुसार वाचक, प्रयोगशाळा सहाय्यक यांच्या संदर्भातही लागू राहतील.

५. अपंग विद्यार्थी / उमेदवाराच्या विशिष्ट गरजा लक्षात घेऊन त्याप्रमाणे सुविधा पुरविण्याबाबत संबंधित परीक्षा मंडळ / केंद्रावरील सूचनांच्या अंमलबजावणीत लवचिकता दाखवू शकतील.

६. सदर शासन परिपत्रक संबंधित मंत्रालयीन विभागांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख तसेच महामंडळे, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, मंडळे, सार्वजनिक उपक्रम व सर्व प्रकारच्या शैक्षणिक संस्था यांच्या तसेच शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग, वैद्यकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच आयुक्त (समाज कल्याण), संचालक (विजा/भज, इमाव व विमाप्र कल्याण), आयुक्त (अपंग कल्याण) यांनी त्यांच्या नियंत्रणाखालील शैक्षणिक व सर्व प्रकारच्या संस्था यांना तातडीने पाठवावे आणि वरील सूचनांचे तंतोतंत पालन करण्याच्या सूचना त्यांना द्याव्यात, असेही आदेश देण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१४०३२११६५३१३९३२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वाक्षरीत
(रा.द शिंदे)
सचिव, महाराष्ट्र शासन.